(६८) १८/३/२०२६

जावक क्र. 1113/२०२६
मुरगूड पोलीस ठाणे
दिनांक 17 /०३/२०२६

Exh. 4/C

प्रति,

**मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारीसो,**
**कागल.**

**यांना सविनय सादर**

**प्रतिवेदक :-** एस डी करे,सहाय्यक पोलीस निरीक्षक, मुरगूड पोलीस ठाणे याजकडुन वि पु की
**विषय :-** गुन्हयातील जप्त मुददेमालाचे म्हणणे सादर केलेबाबत
**संदर्भ :-** किरकोळ फौजदारी अर्ज ३०/२०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सविनय सादर की, मुरगुड पोलीस ठाणे गु र न ३०/२०२६ बी एन एस कलम ३०३[२],३२४[२] प्रमाणे दिनांक १४/०२/२०२६ रोजी ०२.५८ वाजता गुन्हा दाखल आहे.

अर्जदार लता प्रदिप कुमार तर्फे व मु. प्रदिप कुमार,वय ३५,रा सप्तगिरी हॉटेल जवळ,बसवेश्वर नगर,दावनगिरी,जि दावनगिरी यांनी मा. न्यायालयात सदर गुन्हयात जप्त असलेली मारुती सुझुकी कंपनीची स्वीफ्ट डिझायर नंबर KA०१/AR४४२५ ही परत मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

सदर गुन्हयतील आरोपी वीरेश नागराजआप्पा,वय ४४,रा दुर्गा अंबिका मंदिर जवळ, हळीपेट, दावणगिरी,ता जि दावणगिरी,राज्य कर्नाटक याने दिनांक १३/०२/२०२६ रोजी १८.३० ते १८.५८ वा चे दरम्यान मुदतीत मेतके ते गलगले जाणारे रोडवर सत्यवादेवी मंदीराचे शेजारी प्रकाश गणपती पाटील यांचे शेतालगत मेतके,ता कागल गावी रस्त्यालगत लावलेल्या क्रेटा चार चाकी वाहन क्र MH १४/ KN८८१० या वाहनाची पाठीमागील काच फोडुन वाहनाच्या डिक्कीच्या ट्रेवर ठेवलेल्या सोन्या चांदीचे दागीने तसेच रोख रक्कम असा एकुण ३०,३५,५००/- रुपये किमतीचा मुददेमाल असलेली पर्स चोरुन नेली आहे.

१] सदरचा गुन्हा करण्यासाठी आरोपी वीरेश नागराज आप्पा याने मारुती सुझुकी कंपनीची स्वीफ्ट डिझायर नंबर KA०१/AR४४२५ या वाहनाचा वापर केला आहे.

२] गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे तसेच चांदीचे दागीने हे स्वीफ्ट डिझायर नंबर KA०१/AR४४२५ या वाहनातुन जप्त करण्यात आले आहेत.

३] सदर गुन्हयाचा तपास सुरु असुन आरोपी वीरेश नागराजआप्पा हा अद्याप न्यायालयीन कोठडीत आहे.

४] स्वीफ्ट डिझायर नंबर KA०१/AR४४२५ हे लता प्रदिपकुमार यांचे नावावर असल्याचे कागदपत्रावरुन दिसुन येते. लता कुमार या अदयाप तपासकामी हजर झालेल्या नसुन त्यांचेकडे तपास करणे बाकी आहे.

तरी अर्जदार लता प्रदिप कुमार तर्फे व मु. प्रदिप कुमार,वय ३५,रा सप्तगिरी हॉटेल जवळ,बसवेश्वर नगर,दावनगिरी,जि दावनगिरी यांनी मा. न्यायालयात मागणी केलेप्रमाणे गुन्हयात जप्त असलेली मारुती सुझुकी कंपनीची स्वीफ्ट डिझायर नंबर KA०१/AR४४२५ ही ताब्यात देण्यात येवु नये ही विनंती.

मा सविनय सादर

एस. डी. करे
सहाय्यक पोलीस निरीक्षक
मुरगूड पो. ठाणे.

Order
Seen and filed.

J.M.F.C.
17.03.2026

म.आ.क्र ६९० / इ.आ.क्र
दाखल तारीख १८/३/२०२६
17-3-26
प्रशासकीय अधिकारी
दि. न्या. व प्र. व. न्या. कागल

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.03.17 17:22:24 +0900

जा. क्र. ०९४ /२०२६
प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी कागल,
दि. ०७/०३/२०२६

**(मा.प्रणिता एस.पाटीलसो)**
**मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी , कागल यांच्या न्यायालयात**
**किरकोळ फौजदारी अर्ज ३०/२०२६**

प्रति,
पोलिस निरीक्षक
मुरगूड पोलीस ठाणे

विषय ः- किरकोळ फौजदारी अर्ज ३०/२०२६ मधील जप्त मुददेमालाबाबत म्हणणे सादर करणेबाबत...

उपरोक्त विषयांस अनुसरुन आपणास कळविणेत येते की, या न्यायालयात भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम ४९७ अन्वये दाखल केलेला किरकोळ फौजदारी अर्ज ३०/२०२६ मुरगुड पोलीस ठाणे गु.र.ंन ३०/२०२६ मुददेमाल परत मिळणेसाठी अर्जदारांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सदर कामी आपले म्हणणे दिनांक १०/०३/२०२६ इ. रोजी या न्यायालयात सादर करावे असा आदेश केलेला आहे.

तरी पु. ने. ता.१०/०३/२०२६ इ रोजी किंवा तत्पुर्वी या न्यायालयात लेखी म्हणणे पाठवावे.

क. लि.

हुकूमावरुन
स. अ.
फौजदारी न्यायालय, कागल